गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS


वर्ष १ ले | अंक ३२२ वा | शुक्रवार १२ एप्रिल २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 322 | Date : 12/04/2024 blow Friday Page 4 Price 4

## महाराष्ट्राला काय दिले, पवारांनीच हिशेब द्यावा! केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची टीका

नांदेड : डॉ. मनमोहनसिंग-सोनिया गांधी यांच्या यूपीए सरकारच्या १० वर्षांच्या राजवटीत महाराष्ट्राला काय दिले, याचा हिशेब शरद पवार यांना द्यावाच लागेल, असे बजावतानाच पवार आणि उद्धव ठाकरे महाराष्ट्राचा विकास करू शकत नाहीत, असा घणाघाती टोला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गुरुवारी येथे लगावला. नांदेड लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या प्रचारार्थ नायगाव मतदारसंघातील नरसी येथे झालेल्या जाहीर सभेत केंद्रीय गृहमंत्र्यांनी पवार-ठाकरेंसह राज्यातील महाविकास आघाडीची खिल्ली उडवली. ठाकरेंची सेना आणि पवारांची राष्ट्रवादी नकली असून या दोघांनी काँग्रेस अर्धमूर्धी करून टाकली असल्याचे शहा यांनी नमूद केले.

नरसीतील भव्य पटांगणावर पार पडलेल्या या सभेच्या व्यासपीठावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, भाजपाचे संघटनमंत्री संजय कौडगे, आमदार राम पाटील रातोळीकर यांच्यासह इतर लोकप्रतिनिधी, पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रामटेकच्या सभेत पवारांना लक्ष्य



केले होते तर गुरुवारी शाहांनी पवारांचे नाव घेऊन काही सवाल केले. पवार केंद्रात मंत्री असताना दहा वर्षांत महाराष्ट्राला १ लाख ९१ हजार कोटी रुपये मिळाले होते, तर मोदींच्या १० वर्षांत केंद्राकडून महाराष्ट्राला ७ लाख १५ हजार कोटी रुपये मिळाले असल्याचे त्यांनी सांगितले. नरेंद्र मोदींनी गरिबांच्या कल्याणासाठी काम केले. महाराष्ट्रासह देशामध्ये वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून लोकांना मूलभूत सोयीसुविधा दिल्या. देशाचा सर्वांगीण विकास मोदीच करू शकतात, असा दावा करून ही निवडणूक मजबूत भारताचा पाया घालणारी आहे. २०४७ पर्यंत देशाला पूर्ण विकसित करायचे आहे, असेही ते म्हणाले.

शाह यांच्या भाषणापूर्वी देवेंद्र फडणवीस यांनी नांदेडमधील उमेदवार प्रताप पाटील चिखलीकर । पान २ वर

## थेट चंद्रावर भारतीय अंतराळवीर उतरणार

बंगळुरु : भारतीय अंतराळ संशोधन संस्थे (इस्रो)ने चांद्रयान-३ या मोहिमेच्या यशानंतर आता इस्रो एका मानवाला म्हणजेच भारतीय अंतराळवीराला चंद्रावर उतरवण्याची तयारी केली आहे, अशी माहिती इस्रो प्रमुख एस. सोमनाथ यांनी दिली. पत्रकार परिषदेला संबोधित करताना, सोमनाथ म्हणाले की, चांद्रयान कार्यक्रमाच्या पुढील टप्प्यावर वेगाने काम सुरू आहे. २०४० मध्ये चंद्रावर एका मानवालाउतरवण्यासाठी चांद्रयान-४ ची योजना आखली जात आहे. चांद्रयान मालिकेला पुढे नेण्यासाठी आम्ही सातत्याने काम करत आहोत.

पंतप्रधान मोदींनी घोषणा केली आहे की, २०४० मध्ये एक भारतीय व्यक्ती चंद्रावर उतरेल. यासाठी आपल्याला विविध मार्गांनी चंद्राचा शोध घेणे सुरुच ठेवावे लागेल. ते पुढे म्हणाले, चांद्रयान-४ अंतराळयान चंद्रावर लँडिंग, नमुने गोळा करणे आणि भारतीय अंतराळवीरांना पृथ्वीवर परत आणण्याच्या दिशेने पहिले पाऊल आहे. इस्रोकडे सध्या अनेक प्रकल्प आहेत. यामध्ये रॉकेट प्रकल्प, उपग्रह प्रकल्प, अनुप्रयोग प्रकल्प आणि तंत्रज्ञान विकास प्रकल्पांचा समावेश आहे. आमच्याकडे सुमारे ५-१० रॉकेट प्रकल्प, सुमारे ३०-४० उपग्रह प्रकल्प, १०० अनुप्रयोग प्रकल्प आणि हजारो संशोधन आणि विकास प्रकल्प आहेत. आता या वर्षी भारताची सर्वात महत्त्वाकांक्षी मोहीम 'गगनयान' आहे. या मोहिमेत भारत आपले अंतराळवीर तीन दिवसांसाठी अंतराळात पाठवणार आहे.

## मविआच्या नेत्यांनी फेरविचार करावा : विश्वजित कदम

सांगली/प्रतिनिधीः सांगली लोकसभा मतदारसंघ ठाकरेंच्या शिवसेनेकडे गेल्याने काँग्रेस आमदार विश्वजित कदम यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत त्यांची भूमिका जाहीर केली. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सांगलीतील परिस्थिती जाणून घेऊन त्यांनी या जागेबाबत फेरविचार करावा, अशी मागणी विश्वजितकदम यांनी केली आहे. आजच्या पत्रकार परिषदेवेळी



काँग्रेसतर्फे इच्छुक असलेले उमेदवार विशाल पाटील देखील उपस्थित होते. सांगली हा स्वातंत्र्यापासून काँग्रेसचा बालेकिल्ला राहिला आहे. सांगली जिल्हात काँग्रेस मजबूत असून त्यासाठी सांगलीच्या जागेची मागणी केली. सांगली जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या भावना आम्ही काँग्रेस पक्षश्रेष्ठींपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. सांगली जिल्ह्यातील । पान २ वर

## विदर्भात अवकाळी, गारपीट; मराठवाड्याच्या तीन जिल्ह्यांनाही पावसाचा तडाखा

नागपूर : उपराजधानीसह संपूर्ण विदर्भात अवकाळी पावसाने ठाण मांडले आहे. वादळी वारा आणि गारपिटीसह झालेल्या पावसामुळे यवतमाळ, अकोला, अमरावती, बुलढाणा जिल्ह्यात ५० हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. वीज कोसळून एका महिलेचा मृत्यू झाला. हवामान खात्याने पावसाचा मुक्काम आणखी दोन दिवस वाढणार असल्याचे सांगितल्याने शेतकऱ्यांना भर उन्हाळ्यात



अस्मानी संकटाचा सामना करावा लागणार आहे.

गेल्या तीन दिवसांपासून नागपूर, अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ जिल्ह्यांत वादळी वारा आणि गारपिटीसह मुसळधार पाऊस सुरू आहे. नागपूर शहरात दोन दिवस सोसाट्याचा वारा आणि अवकाळी पाऊस कोसळला. इतर जिल्ह्यात वादळी वारा आणि गारपिटीसह झालेल्या पावसाने शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावला. सर्वाधिक नुकसान अमरावती जिल्ह्यात झाले आहे. सुमारे ३५ हजार ३८९ हेक्टर क्षेत्रातील रब्बी पिकांसह फळबागांना पाऊस-गारपिटीचा तडाखा । पान २ वर

## राज्यात सर्वाधिक मतदार पुण्यात; चार जिल्ह्यांमध्ये महिला मतदार सर्वाधिक

मुंबई :लोकसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातील ४८ मतदारसंघातील सुमारे सव्वा नऊ कोटी मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदार संख्येच्या बाबतीत राज्यात पुणे जिल्हा आघाडीवर असून तेथे इतर जिल्ह्यांच्या तुलनेत सर्वात जास्त मतदार आहेत. नंदुरबार, गोंदिया, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग अशा चार जिल्हयांमध्ये पुरुष मतदारांपेक्षा महिला मतदारांची संख्या अधिक आहे.

पुण्यात ८२ लाखांहून अधिक मतदार

पुण्याची एकूण मतदार संख्या ८२ लाख ८२ हजार ३६३ आहे. तर मुंबई उपनगरची एकूण मतदार संख्या ७३ लाख ५६ हजार ५९६ इतकी आहे. ठाण्याची एकूण मतदार संख्या ६५ लाख ७९ हजार ५८८, नाशिक जिल्ह्यातील एकूण मतदार संख्या ४८ लाख ०८ हजार ४९९ इतकी आहे. तर नागपूरची एकूण मतदार संख्या ४२ लाख ७२ हजार ३६६ इतकी आहे.

रत्नागिरी, नंदुरबार, गोंदिया आणि सिंधुदुर्गात महिला मतदारांची संख्या अधिक

चार जिल्ह्यांमध्ये पुरुषांपेक्षा महिला मतदार सर्वाधिक आहेत. रत्नागिरीची एकूण मतदार संख्या १३ लाख ०३ हजार ९३९असून यामध्ये ११ तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ६ लाख ३१ हजार ०१२ आहे तर महिला मतदारांची संख्या ६ लाख ७२ हजार ९१६ इतकी आहे. नंदुरबारची एकूण मतदार संख्या १२ लाख ७६ हजार ९४१ असून यामध्ये १२ तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ६ लाख ३७ हजार ६०९ आहे तर महिला मतदारांची संख्या ६ लाख ३९ हजार ३२० इतकी आहे. गोंदिया जिल्हयातही महिला मतदारांची संख्या जास्त आहे. गोंदियाची एकूण मतदार संख्या १० लाख ९२ हजार ५४६असून यामध्ये १० तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ५ लाख ४१ हजार २७२ आहे तर महिला । पान २ वर

## सोलापूर व माढा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयासाठी चोख बंदोबस्त ठेवावा : जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद

सोलापूर/प्रतिनिधीः भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ४२ सोलापूर ४३ माढा लोकसभा मतदारसंघासाठी दिनांक १२ ते १९ एप्रिल २०२४ या कालावधीत उमेदवारी अर्ज देणे व स्वीकारले जाणार आहेत. नवीन जिल्हाधिकारी कार्यालयात सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय आहेत. तरी पोलीस विभागाने या ठिकाणी निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार चोख बंदोबस्त ठेवावा, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

नियोजन समिती सभागृह येथे आयोजित निवडणूक कामकाज विषयक आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी



अपर जिल्हाधिकारी तथा माढा लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी मोनिका सिंह ठाकूर, पोलीस शहर उपायुक्त विजय कबाडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, उपजिल्हाधिकारी तथा नोडल अधिकारी प्रशिक्षण व्यवस्थापन संतोष देशमुख, खर्च समितीच्या नोडल अधिकारी मीनाक्षी वाकडे यांच्यासह अन्य संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले की, नवीन जिल्हाधिकारी कार्यालयातील सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय असून या कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात उमेदवारी अर्ज दाखल करताना फक्त तीन वाहनांना प्रवेश असेल. तसेच प्रत्यक्ष कार्यालयात उमेदवारासह एकूण पाच व्यक्तींना प्रवेश असणार आहे. त्या अनुषंगाने पोलीस विभागाने अत्यंत सूक्ष्मपणे नियोजन करून सुरक्षा व्यवस्था ठेवावी. त्याप्रमाणेच ईव्हीएम मशीन रामवाडी येथील स्ट्राँग रूम मधून प्रत्येक विधानसभा निहाय पाठवल्या जाणार आहेत त्यासाठी । पान २ वर

## रमजान ईद निमित्त अभिजीत पाटील मित्र परिवार यांच्या वतीने दुध वाटप

### चेअरमन अभिजीत आबा पाटील यांनी विठ्ठल परिवारांची जपली परंपरा

पंढरपूर/प्रतिनिधीः मुस्लिम बांधवांचा सर्वात मोठा सण म्हणून ओळखला जाणारा रमजान ईद या सणाच्या निमित्ताने दि.११एप्रिल रोजी पंढरपूर शहरांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे नेते तथा श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील मित्र परिवार यांच्या वतीने मुर्शिदबाबा दर्गा, कालिकादेवी चौक येथेदर्गाजवळ वाटप करण्यात आले. हिंदू मुस्लिम एकोप्याचे शहर म्हणून ओळखले जाणारे पंढरपूर शहर तसेच मंगळवेढा याशहरांमधील मुस्लिम बांधवांना रमजान ईद च्या निमित्ताने इफ्तार पार्टी देऊन सामाजिक कार्यात पाटील यांनी खारीचा वाटा उचलला असल्याचे दिसून आले.. दूध वाटप तेथील दूध वाटप केंद्राचर आलेल्या मुस्लिम बांधवांनी सांगितले. यंदाच्या वर्षी देखील रमजान ईद च्या निमित्ताने अभिजीत पाटील मित्रपरिवार यांच्या वतीने आज दूध वाटपाचे नियोजन करण्यात आले. कालिका देवी परिसरातील त्याचप्रमाणे त्या लगत असलेल्या बागवान मोहल्या मधील मुस्लिम बांधवांनी या दूध वाटपाचा लाभ घेतला. सणानिमित्त दुध जास्त प्रमाणात लागत असल्याने अनेकांची दुध गोळा करण्यासाठी तरंबळ होते परंतू नाम मात्र




दरामध्ये दूध उपलब्ध करून दिल्याबद्दल तमाम मुस्लिम बांधव अभिजीत आबा पाटील मित्र परिवाराला धन्यवाद देत आहेत.

## प्रणिती शिंदे भरणार १८ एप्रिलला अर्ज

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस महाविकास आघाडीच्या उमेदवार आमदार प्रणिती शिंदे या गुरुवार, १८ एप्रिल रोजी प्रचंड मोठ्या शक्तिप्रदर्शनाने आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. अर्ज दाखल करताना महाविकास आघाडीतील काँग्रेससह, उध्दव ठाकरे यांची शिवसेना, शरद पवार यांची राष्ट्रवादी, माकप, आप या मित्रपक्षांची नेतेमंडळी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती काँग्रेसचे शहराध्यक्ष



चेतन नरोटे यांनी दिली. सोलापूर लोकसभा मतदारसंघात शुक्रवार, १२ एप्रिलपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात होत आहे. शुक्रवार, १९ एप्रिल ही अर्ज भरण्याची अंतिम तारीख आहे. उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर निवडणूक प्रचारातील रंगत आणखी वाढणार आहे. सोलापुरात काँग्रेसकडून आमदार प्रणिती शिंदे, भाजपकडून आमदार राम सातपुते, वंचित बहुजन आघाडीकडून राहुल गायकवाड, यशवंत सेनेकडून । पान २ वर

# संपादकीय

## तापमान वाढीचा फटका..

भारतासारख्या सर्वात मोठ्या लोकशाही देशामध्ये लोकसभा निवडणुकीचे वारे वाहात असले तरी त्याचवेळी उष्णतेची लाटही आली आहे. देशाच्या अनेक भागांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. एप्रिल महिना सुरू होत असतानाच देशाच्या अनेक भागांमध्ये उष्णतेची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ज्या काळामध्ये पाण्याची सर्वात जास्त गरज असते त्याच काळात खूपच कमी पाणी वापरण्यासाठी उपलब्ध असल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. अर्थात, ही संपूर्णपणे नैसर्गिक परिस्थिती असल्याने सरकारी पातळीवर काय करता येईल याचा विचार सुरू असेलच, पण वैयक्तिक पातळीवरसुध्दा एकीकडे उष्णतेचा सामना करत असताना दुसरीकडे उपलब्ध पाण्याचा वापर पर्याप्त पध्दतीने आणि काटकसरीने कसा करता येईल याचा विचार करण्याची गरज आहे. भारतीय हवामान खात्याने दोन दिवसांपूर्वी उष्णतेच्या लाटेचा जो इशारा दिला आहे त्याप्रमाणे एप्रिल ते जूनदरम्यान किमान वीस दिवस उष्णतेची तीव्र लाट जाणवणार आहे. एक गोष्ट लक्षात घ्यावी लागते ती म्हणजे उष्णतेमुळे मानवी आरोग्यावर जरी अनिष्ट परिणाम होत असला तरी तेवढाच मोठा नकारात्मक परिणाम तो शेती उद्योग आणि उत्पादन क्षेत्रावरही होत असतो. वाढत्या उष्णतेमुळे शेतातील पिके वाळून जाणे या घटना तर दरवर्षीच घडत असतात. महत्त्वाची गोष्ट म्हणजे उष्णतेच्या लाटेच्या कालावधीमध्ये सर्वच दैनंदिन व्यवहारांवर परिणाम होत असल्याने आर्थिक व्यवहारांची जी एक साखळी असते ती अनेक वेळा भंग होते. दुपारच्या वेळी गरजेचे असेल तरच घराबाहेर पडा अशा प्रकारचा आदेश आता सरकारी पातळीवरसुध्दा देण्यात आला असल्याने या कालावधीमध्ये जे आर्थिक आणि व्यापारी व्यवहार होत असतात त्यालाही फटका बसू लागला आहे. आजपर्यंतचा इतिहास पाहता निसर्ग नेहमीच आपली जबाबदारी पार पाडत असतो. पावसाळी कालावधीमध्ये जेवढा पाऊस पडतो त्याचे पाणी उर्वरित कालावधीमध्ये पुरू शकते. पण जेव्हा असे पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध असते तेव्हा त्याची उधळपट्टी केली जाते आणि सर्व नियोजनच बिघडून जाते. वाढती उष्णता असो किंवा पाणीटंचाई या दोन्हीला आपणच जबाबदार आहोत. गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये ज्या प्रचंड प्रमाणात वृक्षतोड झाली आणि निसर्गाकडे संपूर्णपणे दुर्लक्ष झाले त्याचे परिणाम आता आपण भोगत आहोत. अर्थात, त्या परिस्थितीमध्ये कोणताही बदल करणे आता शक्य नसले तरी या अनुभवातून शहाणे होऊनच भविष्याचा विचार करावा लागणार आहे.

# फक्त जय भीम बोलणे आंबेडकरवाद नव्हे



जस जशी भिम जयंती जवळ येते तस तशे काही लोकांच्या अंगात आंबेडकरवाद घुसायला सुरवात होते. आंबेडकरवाद म्हणजे जोरजोरात जयभीम बोलणे नव्हे, आंबेडकरवाद म्हणजे जयंती ला दारु ढोसुन नाचणे नव्हणे, आंबेडकरवाद म्हणजे जयंती कार्यक्रमावर निरर्थक खर्च करणे नव्हे, आंबेडकरवाद म्हणजे जयंतीच्या नावाखाली पैशाची उधळपट्टी आणि विचाराचे हनन नव्हे, आंबेडकरवाद म्हणजे मोठ मोठे बॅनर लाऊन दिखावा करणे नव्हे, आंबेडकरवाद म्हणजे जयंती कार्यक्रमाला हजार पाचशे रुपये देऊन तोऱ्यात मिरवणे नव्हे, आंबेडकरवाद म्हणजे जयंती कार्यक्रमात वर्गणीच्या नावाखाली खंडणी वसुल करणे नव्हे, आंबेडकरवाद म्हणजे स्वतः ची दुकानदारी थाटून तडजोड करणे नव्हे, आंबेडकरवाद म्हणजे ज्याची कुवत नसताना ही त्याच्या कडून वर्गणीच्या नावाखाली सक्तीने पैसे गोळा करणे नव्हे, आंबेडकरवाद म्हणजे एखाद्याने नाचगाणे आणि निव्वळ मनोरंजनासाठी पैसे दिले नाही म्हणून त्याला चुकीचे बोलणे नव्हे, आंबेडकरवाद म्हणजे दारू पिऊन नशापान करणाऱ्या लोकांच्या हाती कार्यक्रमाचे सुत्र देणे नव्हे, आंबेडकरवाद म्हणजे लोकांना लुबाडून, नैतिकता कमी करून जयंती कार्यक्रमात मिरवणे नव्हे, आंबेडकरवाद म्हणजे जयंती ला नाचणे आणि महापरिनिर्वाण दिनी रडणे मुळीच नव्हे. आंबेडकरवाद म्हणजे स्वाभिमान, आंबेडकरवाद म्हणजे एकी, आंबेडकरवाद म्हणजे ज्ञान, आंबेडकरवाद म्हणजे संस्कार, आंबेडकरवाद म्हणजे शिस्त, आंबेडकरवाद म्हणजे सामाजिक न्याय, आंबेडकरवाद म्हणजे जागृती, आंबेडकरवाद म्हणजे एकमेकांना गरजेनुसार मदत, आंबेडकरवाद म्हणजे मानवता, आंबेडकरवाद म्हणजे आदर्श जिवन जगण्याची सर्वोच्च प्रेरणा, आंबेडकरवाद म्हणजे एकी, आंबेडकरवाद म्हणजे न्यायासाठी सामुहीक व प्रामाणिक संघर्ष, आंबेडकरवाद म्हणजे तडजोड न करता उभा केलेला सामाजिक लढा होय. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीने, विचार व कार्याने करोडो लोकांचे उत्थान करून देशाला मजबूत करण्याचे काम केले. देशाच्या व व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार यांच्या शिवाय दुसरा पर्यायच नाही. जगाने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे ज्ञान, कार्य व विचार याची दखल घेऊन जागतिक पातळीवर वेगवेगळ्या माध्यमातून गौरव केला आजही गौरव होत आहे. परंतु भारतातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या यांचे कार्य विचार व चळवळ यांच्या विषयी लोक गंभीर नाहीत हेच दिसून येते. प्रस्थापितांची व्यवस्था मोडीत काढून सर्वसामान्य लोकांना देशाचे मालक बनवून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जागतिक क्रांती केली. प्रस्थापित लोक सर्वसामान्य लोकांना गुलाम, लाचार, तुच्छ समजून ते शिक्षण,नोकरी व हक्क अधिकार यांच्या लायकीचेच नसल्याने पुर्वी पासून यापासून दुर तर ठेवलेच परंतु माणसाने माणसाजवळ येऊच नये याची पुर्ण व्यवस्था केली करून स्वतः लाच श्रेष्ठ समजणारे निच लोकांनी सामाजिक व धार्मिक अराजकता निर्माण केली होती. या लोकांची व्यवस्था उद्धस्त करण्याचे काम डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. म्हणुन ह्या लोकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे कार्य मान्य कसे होईल म्हणून या लोकांनी सुरवाती पासून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व कार्याविरोधात काम करायला सुरवात केली. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीचा, कार्याचा व विचाराचा फायदा झालेल्या नव्वद टक्के लोकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर समजून घेण्याचा प्रयत्नच केला नाही या वरून लोकांची बौद्धिक बेइमानी दिसून येते. परंतु जातीच्या नावाखाली व धम्माच्या नावाखाली ज्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना डोक्यावर घेतले तेही लोक आंबेडकरवादी बनलेच असे मुळीच नाही. आज डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवनावर, कार्यावर व विचारावर लाखो लेखक, वक्ते व गायक तयार झाले यापैकी खरचं विचार केला तर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे कीती हा प्रश्न स्वतः च स्वतःच्या मनाला विचारला तर आपल्या समोर किती लोकांची यादी येईल हा चिंतेचा विषय आहे. गायक, लेखक व वक्ते फक्त पैसा मिळतो म्हणून विचार सांगत असतील तर खरंच ते विचाराचे असतील का? सुपारी मिळते म्हणून चळवळ आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर सांगणारे लोक कधीच विचाराचे होऊ शकत नाहीत. अनेक गायक, लेखक व वक्ते असुनही यामध्ये ही अनेक लोकांचे एमेकांसोबत पटत नाही.

जर सर्व जन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन काम करत असतील, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा व विचाराचा सर्वांना सारखाच फायदा व संधी निर्माण झाली असेल तर त्यांच्या च विचाराचे काम करताना वैयक्तिक मतभेद होण्याचे काय कारण? जर वैयक्तिक मतभेद होत असतील तर ते विचाराचे किंवा आंबेडकरवादी आहेत असे कसे म्हणता येईल? राजकीय परिस्थिती कशी आहे याबद्दल तर सर्वांना च माहिती आहे. स्वतः चे पोटभरण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव व चळवळ यांना भांडवल बनवून लोकांना मुर्ख समजून स्वतः चे दुकान थाटने यालाच आज नेता असे म्हणतात. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतः ची मुले, स्वतः ची संपती, स्वतः चे सुख, स्वतः चे ज्ञान, स्वतः चे शिक्षण समाजासाठी खर्च करून गुलामांना राजा बनवले, बेघरांना बंगल्याचे मालक बनवले. शिक्षणाच्या माध्यमातून अधिकारी बनवले. डॉ बाबासाहेब आंबेडकर एकटे होते तरीही करोडो लोकांच्या जिवनात क्रांतीकारी परिवर्तन केले. आज डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन स्वतः ला नेते समजणारे लाखों आहेत परंतु ते स्वतः च्या ही समस्या सोडवू शकत नाहीत याचे एकमेव कारण म्हणजे आज लोकांमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार नाहीत, मनामध्ये प्रामाणिकपणा नाही, स्वाभिमान गहाण टाकून इतरांची हुजरेगिरी आणि लाचारी करणाऱ्यांना समाजाचे काही घेणे देणे नाही, वर्तनात विचार नसल्याने स्वतः ची झोळी भरण्यासाठी हे कोणाच्या ही पायावर लोटांगण घेऊन लाचारी इमानदारीने करू शकतात. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीमुळे, कार्यामुळे आज अनेक विद्वान, अभ्यासु व परिवर्तनाची तळमळ असले अनेक लोक तयार झाले ही वस्तुस्थिती कोणीही नाकारू शकत नाही. परंतु जर विद्वान, अभ्यासु आणि परिवर्तनाची तळमळ असलेले लोकच कधीच एकत्र येत नसतील, नियोजन करत नसतील, वैयक्तिक मतभेद विसरून वैचारिक मुद्यावर एकत्र बसून चर्चा करत नसतील, सामाजिक समस्या व प्रबोधन करण्यासाठी विना नेतृत्व विना जाहिरात समोर येत नसतील तर त्यांचा अभ्यास, विद्वत्ता व तळमळ कोणाच्या कामाची? प्रत्येक जन आंबेडकरवादाच्या नावाखाली काहीना काही करण्याचा प्रयत्न करत असतो परंतु मनात कुठे तरी प्रसिध्दी, पैसा, पद याची लहर असते म्हणून सामाजिक, राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या स्वतःला आंबेडकरवादी समजणाऱ्या लोकांमध्ये एकी नाही किंवा एकिकरण व्हायला पाहिजे यावर कोणीही बोलत नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा दाखला देऊन आपल्या कमाईतील विसावा भाग हा सामाजिक कार्यासाठी द्यावा म्हणून वर्गणी गोळा केली जाते. परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी विसावा भाग हा नाच गाण्यासाठी नव्हे तर सामाजिक उद्धारासाठी देण्याचे सांगितले यावर फार कोणी बोलतही नाही आणि विसावा भाग कोणी देतही नाही. म्हणून नाचगाण्याची वर्गणी दिली कि विसाव्या भागावर बरोबर पडदा टाकला जातो. समाजातील लोकांना शिक्षण, आरोग्य व रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी स्वाभिमानी निधी हा स्वाभिमानी लोकांनी स्वतः च निर्माण करून शिक्षण, आरोग्य व रोजगार यावर खर्च करणे अपेक्षित असताना यावर बोलणे लिहणे सोईस्कर पणे टाकळे जाते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्याचा प्रचार करून प्रसिद्धी व पैसे मिळवणारे खुप आहेत. परंतु यापैकी किती लोक खरंच आपल्या कमाईमधुन काही भाग गोरगरीब मुलांच्या शिक्षणावर, आरोग्यावर व रोजगारावर खर्च करतात हा खुप गंभीर प्रश्न आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे लोक तयार झाले असते तर मनामध्ये खरचं समाजा विषयी तळमळ असती तर कोणत्याही स्वार्थाशिवाय एकत्र येऊन आज शैक्षणिक, वैद्यकीय व औद्योगिक संस्था उभ्या राहून स्वाभिमानी व आर्थिक सक्षम समाज तयार झाला असता. परंतु आपल्या उत्पन्नातील मोठा वाटा जाहिरात, प्रसिद्धी, मोठेपणा, नाचगाणे व व्यसन करण्यावरती निरर्थक खर्च करतील परंतु गोरगरीब लोकांना शैक्षणिक व वैद्यकीय मदतीसाठी हात पुढे येणार नाहीत, कोणाला रोजगार उपलब्ध होईल अशी व्यवस्था निर्माण होईल असे काम विनास्वार्थ कोणी करण्याचा प्रयत्न करत नाहीत. जर शिक्षण, आरोग्य व रोजगार यावर काम जरी करायचे ठरवले असते तर आज शैक्षणिक, वैयक्तिक व औद्योगिक संस्था उभ्या राहून त्यामधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा फायदा समाजालाच होऊन सर्व बाजूने समाज सक्षम व मजबूत झाला असता. राजकीय नेत्यांनी स्वतः ची दुकानदारी थांबवून स्वाभिमान जागृत ठेवून नेतृत्व केले असते, एकीकरणाची कास धरली असती तर सरकार स्थापन होण्यासाठी आंबेडकवादी लोकांचा अगोदर विचार केला असता. परंतु एकत्र येऊन स्वाभिमानी सत्तेचा भाग न बनता बेकी करून लाचार होऊन प्रस्थापितांची हुजरेगिरी करण्यात राजकीय नेते दंग आहेत. नेत्याचे भक्त तर नेत्यांना पेक्षा जास्त कलाकार आहेत. एकही आमदार खासदार सोडा पंचायत समिती, जिल्हा परिषद सदस्य निवडून आणण्याची क्षमता नसलेल्या नेत्यांचे भक्त म्हणतात आमचा नेता सरकार पेक्षा मोठा आहे.

फक्त खोट्या स्तुती मध्ये हवेत उडणारे लोक खरचं विचाराचे कसे होऊ शकतील? बेकी करणारे, लाचार असणारे, तडजोड करून स्वतः चे घर भरणारे, जयंती च्या नावाखाली खंडणी वसुल करणारे यांच्या मध्ये एका गोष्टीत साम्य आहे ते म्हणजे सर्व जन जयभीम बोलतात. पण फक्त जयभीम बोलुन आंबेडकरवादी होता येत नाही. आंबेडकरवादी होण्यासाठी विचार अंगिकारून, पद प्रसिद्धी बाजूला सारून मानसाच्या उद्धाराचे काम निस्वार्थ पणे करावे लागते हेच आंबेडकरवादी होण्याचे लक्षण होय. जयंती दिनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करायचे असेल तर अगोदर विचाराचे होऊन आपण तसे जगायला सुरवात करणे हेच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन असेल.

बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन व जयंती दिनाच्या मंगलमय सदिच्छा

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**



पान १ वरुन

## सोलापूर व माढा निवडणूक निर्णय ..

चोख बंदोबस्त ठेवावा. स्ट्राँग रूम येथे कोणत्याही अनोळखी व्यक्तीला प्रवेश राहणार नाही. निवडणूक संबंधित काम करणाऱ्या प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याला ओळखपत्र असल्याशिवाय प्रवेश देण्यात येऊ नये. ईव्हीएम मशीन विधानसभा मतदारसंघात घेऊन जाणाऱ्या प्रत्येक वाहनासोबत पोलीस सुरक्षा व्यवस्था देण्यात यावी. सर्व चेक पोस्टवर वाहनांची कसून तपासणी करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या. जनरल, पोलीस व खर्च निवडणूक निरीक्षक जिल्ह्यात येत असून त्या अनुषंगाने सर्व संबंधित यंत्रणांनी आपल्याशी संबंधित माहिती तयार ठेवावी. निवडणूक निरीक्षक यांच्या सूचनेप्रमाणे त्यांना सदरची माहिती उपलब्ध करून द्यावी. निवडणूक प्रशिक्षणासाठी अनुपस्थित राहिलेल्या संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांना शो-कॉज नोटीस पाठवून त्यांचे प्रशिक्षण १४ एप्रिल पर्यंत पूर्ण करावे. आयोगाच्या निर्देशक क्रमाने सर्व संबंधित निवडणूक कामकाजासाठी घेतलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले पाहिजे. तसेच एकही निवडणूक कर्मचारी मतदानापासून वंचित राहणार नाही याचीही दक्षता घ्यावी. होम बेस्ड मतदान व पोस्टल बॅलेट मतदानाच्या अनुषंगाने कार्यवाही पूर्ण करावी, असे ही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सूचित केले.

## राज्यात सर्वाधिक मतदार..

मतदारांची संख्या ५ लाख ५१ हजार २६४ इतकी आहे. सिंधुदुर्गची एकूण मतदार संख्या ६ लाख ६२ हजार ७४५असून यामध्ये १ तृतीयपंथीची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ३ लाख ३० हजार ७१९ आहे तर महिला मतदारांची संख्या ३ लाख ३२ हजार ०२५ इतकी आहे. राज्यात १९ एप्रिल, २६ एप्रिल, ७ मे, १३ मे आणि २० मे अशा पाच टप्प्यात होणाऱ्या मतदानासाठी निवडणूक यंत्रणा तयारीला लागली आहे. राज्यात ८ एप्रिल २०२४ पर्यंत एकूण ९ कोटी २४ लाख ९१ हजार ८०६ मतदारांची नोंद आहे. यामध्ये ४ कोटी ८० लाख ८१ हजार ६३८ पुरुष मतदार तर ४ कोटी ४४ लाख ०४ हजार ५५१ महिला मतदार आणि ५ हजार ६१७ तृतीयपंथी मतदार आहेत.

५ जिल्ह्यात ३० लाखांहून अधिक मतदार

अहमदनगर, सोलापूर, जळगाव, कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर या पाच जिल्ह्यांमध्ये ३० लाखांहून अधिक मतदार आहेत. अहमदनगरमध्ये एकूण मतदार ३६ लाख ४७ हजार २५२ आहेत. सोलापूरमध्ये एकूण मतदार ३६ लाख ४७ हजार १४१ आहेत. जळगावमध्ये एकूण मतदार ३५ लाख २२ हजार २८९ आहेत. कोल्हापूरमध्ये एकूण मतदार ३१ लाख ७२ हजार ७९७ आहेत. छत्रपती संभाजीनगर मध्ये एकूण मतदार ३० लाख ४८ हजार ४४५ आहेत.

बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, नांदेड, रायगड, मुंबई शहर, बीड, सातारा, सांगली आणि पालघर या १० जिल्ह्यांमध्ये २० लाखांहून अधिक मतदार आहेत.

## महाराष्ट्राला काय दिले, पवारांनीच

प्रचंड मतांनी विजयी होतील, असा विश्र्वास व्यक्त केला. अशोक चव्हाण यांनी काँग्रेस सोडल्यानंतर या पक्षाची अवस्था ना घर का ना घाट का, अशी झाली आहे. पवार आणि ठाकरे यांच्यासमोर काँग्रेसची फरफट होत असल्याचे फडणवीस यांनी नमूद केले.

## प्रणिती शिंदे भरणार १८ एप्रिलला..

संजय क्षीरसागर यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. यातील काँग्रेस महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे या अर्ज दाखल करण्यासाठी काँग्रेस भवनपासून मिरवणुकीने निघणार आहेत. सुरूवातीला काँग्रेस भवन परिसरात महाविकास आघाडीतील सर्व नेतेमंडळींची भाषणे होतील. त्यानंतर शिवछत्रपती रंगभवन, सिव्हिल चौक, लष्कर जगदंबा चौक, सात रस्ता मार्गे मिरवणुकीने नवीन जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन उमेदवारी अर्ज दाखल केला जाणार आहे. काँग्रेससह महाविकास आघाडीतील सर्वच घटक पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन काँग्रेसचे शहराध्यक्ष नरोटे यांनी केले आहे.

## मविआच्या नेत्यांनी फेरविचार

जागा ही काँग्रेस लढवण्यासाठी सक्षम आहे. पण याचदरम्यान उद्धव ठाकरे यांनी सांगलीच्या जागेवर दावा केला. त्यांनी चंद्रहार पाटील यांची अचानक उमेदवारीही जाहीर केली. महाविकास आघाडीत सांगलीच्या जागेबाबत एकतर्फी निर्णय घेण्यात आला, असा आरोप त्यांनी केला. ठाकरेंनी सांगलीतून चंद्रहार पाटील यांची उमेदवारी जाहीर केल्यानंतर बाळासाहेब थोरात, नाना पटोले आणि पृथ्वीराज चव्हाण यांनी भूमिका घेतली की, सांगलीबाबत ठाकरेंनी घेतलेला निर्णय थोडासा एकतर्फी होता आणि महाविकास आघाडीच्या घटकपक्षांना विश्वासात घेऊन घ्यायला हवा होता. पुढील काही दिवसांत आम्ही काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्याशी चर्चा करून निर्णय घेऊ, असे कदम म्हणाले.

## विदर्भात अवकाळी, गारपीट;

बसला. चांदूरबाजार, मोर्शी, वरुड व अचलपूर या चार तालुक्यांत सर्वाधिक नुकसान झाले. १८ हजार ३०० हेक्टरमधील संत्री, मोसंबी, केळी, आंबा यांचे नुकसान झाले आहे. अकोला जिल्ह्यातील ७४ गावांमधील चार हजार ६० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. सर्वाधिक नुकसान पातुर तालुक्यात झाले. बुलढाणा जिल्ह्यात १०० गावांतील सुमारे साडेतीन हजार हेक्टरवरील पिकांची हानी झाली. यवतमाळ जिल्ह्यातील अडीचशेवर गावांतील दोन हजार हेक्टरवरील पिकांना पावसाने तडाखा दिला. केळापूर तालुक्यात सर्वाधिक ७८० हेक्टरवरील पिके उद्धस्त झाली. फळबागांनाही मोठ्या प्रमाणात फटका बसला.

महिलेचा मृत्यू, अनेक जनावरे दगावली

'यवतमाळ जिल्ह्यात आर्णी-सावळी मार्गावर वीटभट्टीवर काम करणाऱ्या मजूर महिलेचा वीज कोसळल्याने मृत्यू झाला. तर तीन जण गंभीर जखमी झाले.

'वीज कोसळून दोन बैलही दगावले. वादळी पावसामुळे अनेक घरांवरील छपरे उडाली तर पाचशेहून अधिक घरांचे नुकसान झाले. अकोला जिल्ह्यात सुमारे ५५ घरांचे नुकसान झाले.

'बुलढाणा जिल्ह्यात सुमारे तीनशेहून अधिक घरांची पडझड झाली. वीज पडून व झाडाखाली दबून १३ जनावरे दगावली. संग्रामपूर तालुक्यात वीज पडून तीन जण गंभीर जखमी झाले.

विदर्भामध्ये अवकाळी पाऊस आणि गारपिटीने रब्बी पिकांनी हानी झाली आहे. मराठवाड्यातील बीड, परभणी, हिंगोली जिल्ह्यांमध्येही गुरुवारी गारांच्या माऱ्याने नुकसान झाले.आणखी दोन दिवस पावसाचे : भारतीय हवामान खात्याने विदर्भात यापूर्वी सहा ते नऊ एप्रिलपर्यंत अवकाळी पावसाचा इशारा दिला होता. मात्र नव्या अंदाजानुसार विदर्भ आणि मराठवाड्यात १३ एप्रिलपर्यंत पावसाचा मुक्काम वाढला आहे. या कालावधीत विजांच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस आणि गारपिटीची दाट शक्यता आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# स्वेरीत कॉम्प्युटर सायन्स, सिव्हील इंजिनिअरिंग व एमसीए या विभागांचा पालक मेळावा संपन्न

पंढरपूर/प्रतिनिधी : गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग, सिव्हील इंजिनिअरिंग व पदव्युत्तर पदवी असलेल्या एमसीए या तिन्ही विभागांतर्फे एकत्रितरीत्या 'पालक मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या मेळाव्याच्या निमित्ताने पालक आणि शिक्षक यांच्यात झालेल्या संवादाचा फायदा विद्यार्थ्यांना होणार हे मात्र निश्चित!




याप्रसंगी व्यासपीठावर पालक प्रतिनिधी म्हणून महेंद्र घोगरदरे, पांडुरंग ताटे, महिला पालक प्रतिनिधी म्हणून सौ.प्रतिभा गणेचरी ह्या उपस्थित होत्या. दीपप्रज्वलनानंतर कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागातर्फे प्रा. व्ही.डी.जाधव, सिव्हील इंजिनिअरिंग विभागातर्फे प्रा. ए.बी. कोकरे तर एमसीए विभागातर्फे प्रा. एम.वाय शेख यांनी आपल्या विभागातील विशेष नोंदी सादर केल्या.

यामध्ये प्रयोगशाळेत उपलब्ध यंत्र सामुग्री, मशीन्स यापासून ते इंडस्ट्रीयल व्हिजीट च्या माध्यमातून प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी कसे कामकाज चालते याचे प्रात्यक्षिक, स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांची आकडेवारी, अत्यंत अवघड असणाऱ्या गेट या परीक्षेतील गणेश कचरे यांनी देशातून ३९ व्या क्रमांकाने मिळवलेले यश आदी बाबींवर प्रकाश टाकण्यात आला. या परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण आणि उच्च करिअरची दारे खुली होत असल्याचे सांगण्यात आले. स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून विद्यार्थ्यांसंदर्भात विकासात्मक धोरण, नियोजनात्मक मार्गदर्शन आणि उच्चशिक्षित प्राध्यापकांच्या सहकार्याने स्वेरीत 'गेट' परीक्षेची करून घेतली जाणारी तयारी याबाबत सांगितले. प्रत्येक वर्षी विविध विषयांचे मार्गदर्शन वर्ग आयोजित करून तसेच 'डव्हान्सड टेक्निकल ट्रेनिंग'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अशा परीक्षांसाठी आवश्यक संपूर्ण तयारी करून घेतली जाते.

वेळोवेळी घेतल्या जाणाऱ्या टेस्ट आणि त्यांचे विश्लेषण यामधून विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणातील अद्ययावत माहिती दिली जाते. त्यामुळे स्वेरीतील विद्यार्थ्यांना अशा परीक्षांमध्ये घवघवीत यश मिळत असल्याचे सांगितले तसेच या परीक्षेसाठी अत्यावश्यक असणारे सर्व स्टडी मटेरियल हे स्वेरीच्या नूतन इमारतीत असलेल्या मुख्य लायब्ररीमधून उपलब्ध करून दिले जाते, असे सांगण्यात आले. यावेळी कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ.एस.पी. पवार, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता व स्वेरीच्या सिव्हील इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ.पी.एम. पवार व एमसीए विभागातर्फे प्रा. एम.वाय शेख यांच्यासह तिन्ही विभागांतील प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.

प्लेसमेंट विभागाचे प्रा.ए.ए.मोटे यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्वाच्या असणाऱ्या 'गेट परीक्षा, स्वेरीमध्ये येणाऱ्या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कंपन्या, प्लेसमेंट विभागामार्फत चालणारे कार्य, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढीसाठी व करिअर करण्यासाठी आवश्यक बाबी, इंग्रजी भाषा कौशल्ये, संभाषण कौशल्य, सादरीकरण, प्रकल्प, तांत्रिक प्रशिक्षण इंटर्नशीप, स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी? हे करताना पालकांनी कोणती भूमिका घ्यावी ? आदी करिअरच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची माहिती पालकांना दिली. वसतिगृह व्यवस्थापक प्रा. करण पाटील यांनी 'स्वेरी अंतर्गत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी ३ व विद्यार्थिनींसाठी ३ असे स्वतंत्र असलेल्या वसतिगृहाची आजची स्थिती आणि उद्याचे नियोजन यावर अभ्यासपूर्ण माहिती देवून 'विद्यार्थी व विद्यार्थिनी हे अभियंता म्हणून बाहेर पडत असताना एक चांगला माणूस म्हणून समाजात वावरणे ही काळाची गरज ओळखून त्यानुसार स्वेरीतून शिक्षण दिले जात आहे.' हे सांगून 'पाल्यांच्या वसतिगृहा संदर्भात, विद्यार्थ्यांचे भोजन, राहणे व अभ्याससंदर्भात काही अडचण आल्यास केव्हाही संपर्क साधू शकता.' असे आवाहन केले.

यावेळी बाळासाहेब अनपट, संभाजी शिंदे, सचिन दिंडोरे, शिवाजी गायकवाड, अभिजित भोसले, सौदागर खांडेकर, विजयकुमार पांचाळ, शिवाजी पाटील, राजेंद्र अन्नदाते, सौ.सुनिता कोल्हापुरे यांच्यासह इतर पालकांनी काही सूचना केल्या असता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता व स्वेरीच्या सिव्हील इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ.पी.एम. पवार यांनी काही अडचणी जागीच सोडविल्या तर काही प्रश्न वरिष्ठ पातळीवर सोडविण्याचे आश्वासन दिले. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजिलेल्या या पालक मेळाव्यात तिन्ही विभागातील मिळून जवळपास २०० पालक, तसेच विभागातील प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रा. पी.व्ही.केळकर यांनी पालक मेळाव्याचे सूत्रसंचालन करून आभार मानले.

## मराठी नववर्षानिमित्त गुढीपाडवा मुहूर्ताव ठोकडे परिवाराकडून कमलाई देवीची पूजा

पंढरपूर/प्रतिनिधीः श्री कमलाई देवी मंदिरामध्ये महापूजा भोगी आज चैत्र शुद्ध १. नववर्षानिमित्त गुढीपाडवा मुहूर्तावर करमाळयाचे कर्तव्यदक्ष तहसीलदार शिल्पा ठोकडे व सुधीर घोंगडे पद्धतशीर विश्र्वस्त तथा करमाळा तहसीलदार यांच्या हस्ते करण्यात आली



यावेळी अध्यक्ष सोमनाथ छोटे सचिव अनिल पाटील विश्र्वस्त डॉक्टर प्रदीप कुमार जाधव पाटील विश्र्वस्त डॉक्टर महिंद्र नगरे विश्र्वस्त सचिन राठोड विश्र्वस्त राजेंद्र वाशिंबेकर विश्र्वस्त अँड शिरीष कुमार लोणकर प्रशासनाधिकारी महादेव भोसले व्यवस्थापक अशोक साठे, तसेच रोहित पुजारी सचिन चोरटे किसान आप्पा सोरटे दादासाहेब पुजारी बापू यांना पुजारी ओंकार पुजारी राहुल चोरटे योगेश्वरटे मानकरी सेवेकरी इत्यादी उपस्थित होते

## सैनिक वेल्फर असोसिएशन टाकळीवाडी यांच्यावतीने मुस्लिम बांधवांना रमजान ईद च्या शुभेच्छा.

पत्रकार नामदेव निर्मळे

टाकळीवाडी ता.शिरोळ येथील हिंदु मुस्लिम अतिशय गुण्या गोविंदाने गावामध्ये राहतात. आज रमजान ईद सणानिमित्त दूध वाटप करून त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रमेश निर्मळे, अध्यक्ष महादेव बदामे, उपाध्यक्ष नंदू कांबळे,तंटामुक्त अध्यक्ष केंदबा कांबळे,सुभेदार मेजर बाळू कुंभार,सुभेदार संजय बदामे, तालुका उपाध्यक्ष मोहन निर्मळे, पी. बी. पाटील, गोपीनाथ निर्मळे, समीर आरकाटे, तसेच संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## श्रीमती छाया कांबळे मॅडम यांना राजमाता जिजाऊ आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त



पत्रकार नामदेव निर्मळे

टाकळीवाडी ता.शिरोळ येथील जिल्हा परिषद शाळा कुमार विद्यामंदिर येथील एक आदर्श शिक्षिका म्हणून प्रचलित असलेले, जेष्ठ असे स्वभावाने अतिशय गोडवानी असणारे, श्रीमती छाया बाबासो कांबळे यांना महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ कोल्हापूर यांच्याकडून दिला जाणारा राजमाता जिजाऊ आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त झाला.प्रत्येक विद्यार्थी शिकला पाहिजे अशी त्यांची तळमळ आहे. आपल्या पतीच्या वर्ष श्राद्धाला फाटा देत त्यांनी अनेक शाळांना मदत केलेली आहे.

शिक्षणापासून विद्यार्थी वंचित राहता कामा नाही.

असा त्यांचा ध्यास आहे. गावामध्ये यांचे कौतुक होत आहे. आदर्श शिक्षक कसा असतो. याचे एक उदाहरण आज गावकऱ्यांना बघायला मिळत आहे.

## लिंगायत समाजाच्या चळवळीमध्ये विजयकुमार हत्तुरे यांचे मोठे योगदान : आ. प्रणिती शिंदे

सोलापूर/प्रतिनिधी : जागतिक लिंगायत महासभा (कर्नाटक) लिंगायत समाजातील सर्वात मोठी संघटना असून एक शिखर संस्था म्हणून नावाजलेले आहे. जागतिक लिंगायत महासभा या संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्षपदी विजयकुमार हत्तुरे यांची निवड झाल्याबद्दल आमदार प्रणिती शिंदे यांनी त्यांचा सत्कार करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी कॉंग्रेस प्रदेश प्रवक्ता काकासाहेब कुलकर्णी, सोनार मामा,सिद्धेश्र्वर साखर कारखाना कामगार युनियनचे अध्यक्ष अशोक बिराजदार, मजरेवाडी चे बालाजी चौगुले, नितीन भोपळे, सौ. गीता वारे,गौराबाई कोरे,लहू कोरे, नागेश हत्तुरे,पप्पू पाटील राजशेखर हत्तुरे ,शैलेश शेवगार, नागेश पडनुरे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रणिती शिंदे म्हणाले लिंगायत चळवळीमध्ये विजयकुमार हत्तुरे यांचे मोलाचे योगदान असून ते नेहमी समाज हितासाठी कार्य करत असतात. मंगळवेढा येथील महात्मा बसवेश्र्वरांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे तसेच लिंगायत समाजातील विविध मागण्या संदर्भात आपण पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले. सत्काराला उत्तर दताना हत्तुरे म्हणाले राज्यभरात समाज संघटित करून संघटनेचा विस्तार करणार असल्याचे सांगितले. आमदार प्रणिती शिंदे नेहमी लिंगायत समाजाच्या पाठीशी उभे राहिले आहेत. माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांची सत्कार करून पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. यावेळी मोठ्या संख्येने मजरेवाडी परिसरातील जन समुदाय उपस्थित होता. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे साहेब, कर्नाटक राज्याचे मंत्री एम. बी. पाटील, आळंदचे आमदार बी. आर. पाटील, अफजलपूर चे आमदार एम. आय.पाटील,श्री सिद्धेश्र्वर देवस्थान पंच कमिटी अध्यक्ष धर्मराज काडादी, शिवव्याख्याते शिवरत्न शेटे, माजी आमदार रवी पाटील,माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, माजी आमदार शिवशरण पाटील बिराजदार,शिक्षण महर्षी राजशेखर शिवदारे,अँड रामदास फताटे,श्री सिद्धेश्र्वर बँकेचे चेअरमन प्रकाश वाले, श्री सिद्धेश्र्वर सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन सिद्धाराम चाकोते, उमराणी चे महादेव भैरगोंडे (सावकार) आदी सह समाजातील विविध मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या आहेत.



## कळंब उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयामध्ये भूमापन दिन साजरा



कळंब/प्रतिनिधि : कळंब येथे दि.१० एप्रिल २०२४ रोजी भूमापन दिनाचे औचित्य साधून कळंब येथील उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील सर्व मोजणीच्या यंत्राचे पुष्पहार,श्रीफळ व पूजन करून भूमापन दिन साजरा करण्यात आला.

यावेळी कळंब भूमि अभिलेख कार्यालयातील कर्तव्यदक्ष अधिकारी श्री.गायके डी. बी. सुरवसे आर. एस. माळी बी.बी. मॅडम. साळुंके बी डी . शडोळकर एम बी. जवेरी पी ए, नमस्ते धाराशिचे न्यूज चे तालुका प्रतिनिधी राजकुमार आडसूळ व ईतर कार्यालयात उपस्थित सर्व शेतकरी यांच्या उपस्थित भूमापन दिन साजरा करण्यात आला.

## कल्याण अन्नपूर्णानगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे आयोजन

ठाणे/प्रतिनिधी :ज्येष्ठ नागरिक संघ, महिला मंडळ व तरुण मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने अन्नपूर्णानगर आधारवाडी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती साजरी करण्याचे निश्चित केले आहे.

प्रतिवर्षी साजरा होत असणाऱ्या या आगळ्यावेगळ्या जयंती महोत्सवाला स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. फक्त एक वक्ता हे या जयंती उत्सवाचे वैशिष्ट्य असून यदांच पाचवे वर्ष आहे. या वर्षी ज्येष्ठ कवी साहित्यिक कालेनंद कुंबफळेकर यांची प्रकट मुलाखत रंगणार असून त्यांची मुलाखत सुप्रसिद्ध निवेदक शशिकांत चव्हाण हे घेणार आहेत. तसेच नगरातील एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण होऊन अधिकार पद प्राप्त झालेल्यांचा सन्मान यावेळी करण्यात येणार आहे.

यावेळी धम्मगीतांचे आयोजन करण्यात आले. या उत्सवाला स्थानिक नगरसेवक वरूण शेठ पाटील यांचे विशेष सहकार्य लाभत असते.

पदाधिकारी यांच्या वतीने सर्व सर्व नागरिकांनी या जयंती उत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन केले आहे.

## क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्ताने रक्तदान शिबिर संपन्न

करमाळा/प्रतिनिधी : क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्ताने आज डॉ आंबेडकरवादी चळवळ व सामाजिक संघटना यांच्या वतीने आयोजित करण्यात आले या शिबिराचे उद्घाटन डॉ सादीक बागवान व बालरोगतज्ज्ञ डॉ प्रशांत करंजकर यांच्या हस्ते करण्यात आले या शिबिरात नव्वद रक्त दात्याने रक्त दान करून क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना रक्त दान करून क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना रक्त दालनाच्या माध्यमातून अभिवादन करण्यात आले हे रक्त दान शिबिर यशस्वी करण्यासाठी संघटनेचे सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले व यशस्वी हि केले



# श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या ४२ व्या गळीत हंगामाची सांगता

## * विठ्ठल कारखान्याच्या सांगता समारंभात शिरली माढ्यांची डाळ
## * विठ्ठल कारखान्याचे यशस्वी १०,८१,०११ मे.टन गाळप पूर्ण






पंढरपूर/प्रतिनिधीः श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचा सन २०२३-२०२४ चा ४२ व्या गळीत हंगामात यशस्वी गाळप करून गळीत हंगामाचा सांगता समारंभ ह.भ.प.श्री रमेश महाराज वसेकर श्री संत सावता महाराज यांचे १६ वे वंशज श्रीक्षेत्र अरण व ह.भ.प.श्री देवव्रत (राणा) महाराज वासकर, पारंपारिक फडाचे जेष्ठ अधिकारी श्रीक्षेत्र पंढरपूर, श्री शिवतेजबाबा मोहिते-पाटील, श्री दादासाहेब साठे, श्री संजय कोकाटे, श्री शिवाजी कांबळे कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीतआबा पाटील व सर्व संचालक मंडळाचे यांचे प्रमुख उपस्थितीत व कारखान्याचे संचालक श्री बाळासाहेब चिंतामणी हाके व त्यांचे सुर्विद्य पत्नी सौ. सुवर्णा बाळासाहेब हाके या उभयतांचे शुभहस्ते श्री सत्यनारायण महापुजेने बुधवार दिनांक १०.०४.२०२४ रोजी संपन्न झाला...

गळीत हंगाम शुभारंभ प्रसंगी सभासद व ऊस पुरवठादार शेतकरी य तोडणी वाहतुक ठेकेदार यांना आवाहन करणेत आले होते की, जे जास्तीत जास्त ऊस पुरवठा करतील त्यांचा सन्मान करणेत येईल. त्यानुसार या गळीत हंगाम सांगता समारंभ प्रसंगी कारखान्यास या गळीत हंगामात सर्वात जास्त ऊस पुरवठा केलेले श्री सदाशिव यशवंत गाजरे रा.शेळवे, श्री सुनिल ज्ञानेश्र्वर मोरे रा. पटवर्धन कुरोली, श्री सुरेश मुरलीधर घाडगे रा. देगांव या तीन सभारादांचा सत्कार करण्यात आला. तसेच ऊस वाहतूक करणारे ठेकेदार श्री नितीन रघुनाथ शिंदे, श्री विष्णू भाऊसाहेब रुपनर, श्री नागनाय ज्ञानोबा जाधव, अनिल उत्तम चव्हाण यांचा व एकरी १०० मे. टन उत्तारा मिळालेले शेतकरी श्री रामचंद्र गोवर्धन देठे, हरीदास दशरथ कौलगे, अशोक एकनाथ भोसले या शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. गळीत हंगाम यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल कारखान्याचे खातेप्रमुख यांचे अभिनंदन करून सन्मान करणेत आला.

...सदर प्रसंगी कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीतआबा पाटील म्हणाले की, पंढरपूर तालुक्याचा वैभव व आर्थिक कणा असलेला श्री विठ्ठल कारखाना हा बंद अवस्थेत होता, या कारखान्याच्या आर्थिक व तांत्रिक परिस्थितीवर मात करून यशस्वीरित्या चालु करून दाखविला व सन २०२२-२०२३ गळीत हंगामामध्ये ७,२६,०१४ मे.टन ऊसाचे गाळप केले व सन २०२३-२४ गळीत हंगामामध्ये कमी कालावधीत यशस्वी गाळप करन १०,८१,०११ मे.टन ऊसाचे गाळप करून १०.३८ टक्के साखर उताराने १०,८५,०२५ क्विंटल साखर उत्पादन केले आहे. पुढील सिद्वानमध्ये जास्तीत जास्त गाळप करणेसाठी सर्वांनी असेच सहकार्य करावे, असे आवाहन केले.

सदर प्रसंगी ह.भ.प.रमेश महाराज वसेकर (श्री संत सावता महाराज यांचे १६ वे बंशज) श्रीक्षेत्र अरम हे बोलाताना म्हणाले की, गळीत हंगाम सांगता समारंभाचे कार्यक्रमास बोलवल्यामुळे सर्व संचालक मंडळाचा आभार आहे. कारखान्याची अशीच प्रगती व्हावी असे आशिर्वाद दिले.

या प्रसंगी आपल्या आध्यात्मिक शैलीत ह.भ.प.श्री देवव्रत (राणा) महाराज वासकर पारंपारिक फडाचे जेष्ठ अधिकारी श्रीक्षेत्र पंढरपूर हे बोलाताना म्हणाले की, श्री विठ्ठल कारखान्याला शेतकऱ्यांचा राजवाडा म्हणून संबोधले जाते, परंतु मागील काही काळात हा कारखाना बंद अवस्थेत होता हा बंद अवस्थेत असलेला कारखाना चालू करून मागील दोन गळीत हंगाम यशस्वीपणे गाळप केले आहे. त्यामुळे चेअरमन मा.श्री अभिजीत (आबा) पाटील हे या कारखान्यास भागील गतवैभव पुन्हा प्राप्त करतील, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रम प्रसंगी बोलताना शिवतेजबाबा मोहिते-पाटील म्हणाले, मागील काही काळात श्री विठ्ठल कारखाना बंद होता त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांच्या ऊसाचा गंभीर प्रश्र्न निर्माण झाला होता. सहकारातील एखादा कारखाना बंद पडला तर तो चालू करणे शक्य होत नाही. परंतु अभिजीत पाटील यांनी बंद पडलेला कारखाना चालू करुन या भागातील शेतकऱ्यांना न्याय दिलेला आहे. भविष्यात श्री विठ्ठल कारखान्यास नक्कीच चांगले दिवस येतील असा विश्र्वास व्यक्त केला.या प्रसंगी दादासाहेब साठे, संजयबाबा कोकाटे, शिवाजी कांबळे, ॲड. बाळासाहेब पाटील, कारखान्याचे संचालक तुकाराम मस्के सर यांनी ही आपले मनोगत व्यक्त केले. कारखान्याचे प्र. कार्यकारी संचालक श्री डी. आर. गायकवाड हे प्रास्ताविकपर भाषणात बोलताना म्हणाले की, गळीत हंगाम २०२३-२४ मध्ये आपल्या सर्वाचे सामुहिक प्रयत्नामुळे कारखान्याने कमी दिवसात जास्तीत जास्त गाळप केले. याबद्दल मी सर्व ऊस उत्पादक शेतकरी सभासद, बिगर सभासद उस पुरवठादार शेतकरी, तोडणी वाहतुक ठेकेदार, मजूर, हंगामी कंत्राटदार, तसेच खाते प्रमुख, विभाग प्रमुख, कर्मचारी व कामगार, तथा गाल पुरवठादार व्यापारी व हितचिंतक यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. मा. चेअरमन मार्गदर्शनाखाली व्यवस्थापन ठरवेल ते उद्दिष्ट साध्य करणेसाठी आम्ही सदैव तत्पर राहू अशी ग्वाही मी सर्व खातेप्रमुख, कामगार व कर्मचारी यांचे वतीने देतो.

या कार्यक्रमाचे उप प्राचार्य श्री डोंगरे सर व नितीन पवार यांनी सूत्रसंचालन केले व कारखान्याचे माजी संचालक रायाप्पा हळणवर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.या कार्यक्रमासाठी कारखान्याचे व्हाईस चेअरमन सौ. प्रेमलता रोंगे, संचालक सर्वश्री संभाजी भोसले, कालिदास पाटील, दिनकर चव्हाण, सुरेश भुसे, धनंजय काळे, साहेबराव नागणे, कालिदास साळुंखे, जनक भोराले, सचिन वाघाटे, प्रविण कोळेकर, नवनाथ नाईकनवरे, दत्तात्रय नरसाळे, सिताराम गवळी, अशोक जाधव, श्रीमती कलावती महादेव खटके, सौ सविता विठ्ठल रणदिवे, दशरथ जाधव, अशोक तोंडले, अंगद चिखलकर, अशोक घाडगे, तानाजी बागल, सचिन शिंदे-पाटील, समाधान गाजरे, धनाजी खरात, उमेश मोरे, गणेश ननवरे तसेच माजी संचालक धोंडीबा वाघमारे, राजाराम सावंत तसेच मधुकर नाईकनवरे, भारतनाना पाटील, भाऊसाहेब महाडिक, कल्याणराव पाटील, नितीन कापसे, बलभिम लोंढे, सुभाषदादा भोसले, संदिप मांडवे, शिवाजीभाऊ पाटील, प्रथमेश पाटील, रमेश चोपडे, ॲड. योगेश रणदिवे, दिगंबर फाळके, किरण घोडके कारखान्याचे सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग, कार्यकर्ते, सभासद, व्यापारी, ऊस तोडणी वाहतूक ठेकेदार, मजूर व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

## लढाई फक्त माझी नसून आपल्या सगळ्यांचे आहे : आमदार प्रणिती शिंदे



पंढरपूर/प्रतिनिधी : ही लढाई फक्त माझी नसून आपल्या सगळ्यांचे आहे व आपल्या सगळ्याचा भाजप चित्र आहे गेल्या दहा वर्षात भाजपने फक्त विश्र्वासघात केला आहे अशी टीका आमदार प्रणिती शिंदे यांनी केलेले मोहोळ तालुक्यातील गावाकडच्या दरम्यान बुधवारी पणेती शिंदे गोटेवाडी येथे यावेळी पुढे बोलताना आमदार प्रणिती शिंदे म्हणाले की राजकारणात सत्तेसाठी आली नाही किंवा टक्केवारीसाठी आली नाही मला येडीची भीती वाटत नाही कारण माझ्याकडे कारखाना नाही किंवा सोसायटी नाही दरम्यान मी माझी एकटीची लढाई नाही तर आपल्या सगळ्यांची लढाई आहे सामान्य लोक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १५ लाखाची वाट पाहत आहेत भाजपने लोकांकडून मतदान घेऊन त्यांचा वापर करून घेतला आहे त्यांनी कितीही करून दाखवले नाही अशी टीकाही त्यावेळी शिंदे

दरम्यान या भाजपच्या दोन्ही खासदारांनी सोलापूर लोकसभा मतदारसंघात कोणतीही काम केली नाही सुरुवातीला एका खासदाराने काम केले नाही म्हणून दुसरा उमेदवार दिला त्यांनीही काम केले नाही म्हणून आता तिसरा उमेदवार आपला असलेली टीका प्रणिती शिंदे यांनी केले दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेली कोणतीही आश्र्वासन पाळले नाही मोठ्या प्रमाणात महागाई वाढली आहे तीनशे रुपये बाराशे रुपये झाले आहे त्या शेतकऱ्यांच्या खतावर देखील जीएसटी लावली आहे एका बाजूला सहा हजार रुपये देतात आणि दुसऱ्या बाजूला जीएसटी लावून पैसे काढून घेतात अशी टीका शिंदे यावेळी मोहोळ तालुका काँग्रेसचे अध्यक्ष सुलेमान तांबोळी मंगळवेढा काँग्रेस तालुका अध्यक्ष प्रशांत साळे राजेश पवार पांडे किशोर पवार सीमा पाटील विक्रम देशमुख बालाजी लोकरे यांच्या सौ काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने नागरिक ही उपस्थित होते

## मुख्याध्यापकांची पेन्शनकेस सह सर्व कागदपत्रांवर सह्या करण्याचा अधिकार शाळा व्यवस्थापन समितीला द्यावा : एस.बी. देशमुख


निफाड/प्रतिनिधी : नाशिक जिल्ह्यातील बऱ्याच संस्थेत संस्थाअंतर्गत वाद असल्यामुळे मुख्याध्यापकांची पेन्शन केस , रजा रोखीकरण, मेडीकल बीले ,सेवापुस्तक यावर संस्थाचालक सह्या करत नाही . आर्थिक मागणी करून अडवनुक करतात अशा अनेक तक्रारी नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाकडे आल्या आहेत . तेव्हा मुख्याध्यापकांच्या सर्व कागद पत्रांवर सह्यांचे अधिकार शाळा व्यवस्थापन समितीला द्यावे अशी मागणी नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाने शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांच्याकडे मेलद्वारे केली आहे . नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष एस के सावंत यांच्या अध्यक्षतेखाली व्ही एन नाईक शिक्षण संस्था डोंगरे वसतीगृह नाशिक येथे सहविचार सभा संपन्न झाली या वेळी प्रास्ताविक सघाचे उपाध्यक्ष प्रदिप सांगळे यांनी केले .या वेळी शिक्षणाधिकारी कार्यालयातील प्रलंबीत प्रश्र्न, जन्मतारिख, जात ,नाव बदल हे प्रस्ताव ८ दिवसांच्या आतच निकाली काढावे . ऊ.एव . टु इ .एव . प्रस्ताव ,पेन्शन केस, न्यायालयीन प्रकरणे




हे प्रश्र्न त्वरित मार्गी लावावेत पे युनिट मधील प्रश्र्न फरक बीले, त्रुटी असलेले फरक बीले त्वरित द्यावी, टपाल घेण्याची व्यवस्था व मागील आवक बारनिशीची पडताळणी करावी पेन्डिंग बीले प्रतिक्षा यादी प्रमाणे मंजुर करावी .मुख्याध्यापकांना सन्मानाची वागणुक द्यावी , शिक्षण उपसंचालक कार्यालयातील शालार्थ आय डी संच मान्यता दुरुस्ती नवीन वर्ग व तुकडी मान्यता सेमी इंग्रजीचे प्रस्ताव त्वरित निकाली काढावे . मुख्याध्यापक, शिक्षक यांना अशैक्षणिक कामे देवु नये . सेवानिवृत्त मुख्याध्यापकांचे पद सेवानिवृत्तीनंतर मुख्याध्यापक संघातून आपोआप रद्द होईल व प्रत्येक तालुक्यातुन २० नविन आजीव सभासद व शहरातून ५ सभासद रितसर करून त्यांची आजिव सभासद म्हणुन नोंद करून प्रत्येक तालुका प्रतिनिधींना मुख्याध्यापक संघात स्थान द्यावे या विषयावर महत्वपूर्ण वादळी चर्चा झाली या*वेळी मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष -एस .के . सावंत , सचिव एस .बी . देशमुख, उपाध्यक्ष पी . एस .सांगळे, ए .के . कदम, बी . डी .गांगुर्डे ,डी .के .गायकवाड, ए . एल . घोडेराव , डी .जी . रणधीर, डी .एस . व्याळीज , डॉ . अनिल माळी , एम . डी . काळे, मनोज वाकचौरे, बी ए खरोटे , के .डी .देवढे, भागीनाथ घोटेकर , आर .टी . जाधव, अनिल देवरे, बी . के . शेवाळे ,

## पडघ्यात महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंतीचे आयोजन

भिवंडी/मिलिंद जाधव :क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले व विश्र्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव पडघे विभागाच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले व विश्र्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती रविवार दिनांक १४ एप्रिल २०२४ रोजी मोठ्या उत्साहाने पडघा केंद्रावर जिल्हा परीषद मराठी शाळेत साजरी होणार आहे. सकाळी ठिक १० वाजता




कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परीषद मराठी शाळेच्या पटांगणात होणार आहे. तर प्रबोधन सत्रामध्ये महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन प्रवास डॉ. वैशाली महाजन आपल्या भाषणातून सांगणार आहेत.

तर सायंकाळी ठीक ५.३० वाजता समतानगर ते पडघा जिल्हा परिषद मराठी शाळेपर्यंत भव्य मिरवणूक निघणार आहे. सदर कार्यक्रमासाठी सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले व विश्र्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव पडघे विभाग यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## नळदुर्ग शहरात उन्हाळ्यात झाडांना मिळाले जीवदान

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : सध्याचा कडक उन्हाळ्यात तापमान दिवसेंन दिवस वाढतच आहे आशा महा भयानक उन्हाळा पाहुन नागरीक हैरान झाले आहेत .

मानवा बरोबर झांडाना ही जीवदान देण्याची खुप गरज आसल्यामुळे नळदुर्ग येथील वृक्षमित्र पद्माकर घोडके यांच्या संकल्पनेतील वृक्ष लागवड नळदुर्ग शहरात खुप मोठ्या प्रमाणात झाली ही वृक्ष जिवंत राहाण्यासाठी नळदुर्ग येथील मैलारपूर कट्टा मित्र परिवाराचा आनोखा उपक्रम हाती घेतला आणि दोन दिवसा आड टँकरने वृक्षाना पाणी पुरवठा करण्याचा निर्णय घेतला नळदुर्ग शहरात बसंस्थानक ते बाजारात जाणारा मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूला , नगर परिषद कार्यालय कडे जाणारा रस्ता या दोन्ही बाजुला , बालाघाट कॉलेज ते डॉ बाबासाहेब आंबेडकर संविधान चौक , आदी शहरात ठिक ठिकाणी वृक्ष लागवड झाली आहे त्या ठिकाणी या झांडाना पाणी मिळाले पाहिजे कारण झाडे सुद्धा या उन्हाने तळपळत आहे

मानव कसा पण जगेल पण मानवाला जगण्यासाठी वृक्षाची गरज लागते म्हणून पद्माकर घोडके यांची संकल्पना व मैलारपूर



कट्टा परिवाराच्या वतीने खुप मोठा उपक्रम हाती घेऊन यशस्वीपणे पार केला आहे पुर्ण उन्हाळा संपे पर्यंत दर दिवसा आड पाणी पुरवठा करण्याचे आणि झाडे जगविण्याचा संकल्प मैलारपर कट्टा मित्र परिवाराने वृक्षाना पाणी देत आसताना नळदुर्ग नगरीचे माजी नगराध्यक्ष उदय भाऊ जगदाळे , सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास अंहकारी , नळदुर्ग शहर पत्रकार संघटनेचे अध्यक्ष सुहास येडगे , ज्येष्ठ पत्रकार विलास येडगे , नळदुर्ग शहर पत्रकार संघटनेचे सचिव तानाजी जाधव , डॉ आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलचे संस्थापक तथा रिपाईचे नळदुर्ग शहर अध्यक्ष मारुती खारवे , माजी नगरसेवक विनायक अंहकारी , सामाजिक कार्यकर्ते संजय विठ्ठल जाधव , माजी नगरसेवक सुधिर हजारे , पद्माकर घोडके , पत्रकार उत्तम बनजगोळे , पत्रकार दादासाहेब बनसोडे , सोसायटीचे संचालक रघुनाथ नागणे ,पत्रकार मित्र अमर भाळे यांच्या सह नागरीक उपस्थित होते . हा उपक्रम हाती घेऊन यशस्वीपणे पार होत आसल्यामुळे सर्वांचे अभिनंदन व कौतुक होत आहे .

## स्वामी भक्तीतच समाधानी जीवनाचे राजमार्ग : शिक्षणमंत्री केसरकर



अक्कलकोट /प्रतिनिधीः देवाने जे दिले आहे त्यात समाधान मानणे यातच जीवनाची धन्यता आहे. त्याकरिता भाविकांनी स्वामीभक्तीत गुंतून स्वामींचे नामस्मरण, मनन, चिंतन करीत राहणे यातच जीवनाचे सौख्य सामावले आहे. स्वामी भक्तीने जीवनाचा अर्थ समजून जीवन सोपे होते,

कारण स्वामीभक्तीतच समाधानी जीवनाचे राजमार्ग असल्याचे व आध्यात्मिक व धार्मिक क्षेत्रात वटवृक्ष देवस्थानचे कार्य खुप महान असल्याचे मनोगत राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांच्या प्रकट दिनानिमित्त पहाटेच्या काकड आरती प्रसंगी श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी दीपक केसरकर यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. या प्रसंगी बोलताना केसरकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष ननू कोरबू,मंदिर समितीचे व्यंकटेश पुजारी, मंदार महाराज पुजारी, गिरीश पवार, संजय पवार, सचिन हन्नूरे, भिमा मिनगले, श्रीकांत मलवे, प्रसाद सोनार, सागर गोंडाळ, इत्यादी उपस्थित होते.